## नि.दि.मु.नं. ४३/२०१८ मधील नि. ४३ वरील आदेश

०१. प्रस्तुत अर्ज प्रतिवादी क्र. ०१ यांनी त्यांचे विरुध्द झालेला 'उलटतपास नाही' आदेश रद्दबातल करण्यासाठी दिलेला आहे.

०२. थोडक्यात प्रतिवादी यांचे कथन असे की, प्रतिवादी हे हजर नसल्याने वकील वादीचा क्रॉस घेवु शकले नाही व उपस्थीत राहीले नसल्याने सदरकामी प्रतिवादी विरुध्द 'उलट तपास नाही' आदेश दिनांक १५/०९/२०२१ रोजी नि.क्र. ४१ पारित करणेत आला. करिता प्रतिवादी विरुध्द झालेला 'उलटतपास नाही' आदेश रद्द होणेची विनंती केलेली आहे.

०३. प्रस्तूतचे अर्जास वादी यांनी आपले म्हणणे दाखल केलेले आहे. सदरच्या दाव्यात वादी याने त्यांचा पुरावा दिनांक २४/०१/२०२० रोजी दाखल केलेला आहे. सदरचे प्रकरण अनेक महिन्यापासून उलटतपासावर आहे. प्रतिवादी हे वारंवार पुकारले असता देखील हजर राहीले नाहीत. प्रतिवादीचा अर्ज खर्चासह नामंजूर करावा अशी विनंती केली आहे.

०४. सदर दाव्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, वादी यांनी त्यांचे सरतपासाचे प्रतिाज्ञापत्र दिनांक २४/०१/२०२० रोजी दाखल केलेले आहे. प्रतिवादी यांच्या वकीलांनी प्रतिज्ञा पत्राची प्रत दिनांक १६/०३/२०२१ रोजी घेतलेली आहे. त्यानंतर पुरेसी संधी देवुन देखील प्रतिवादी यांनी वादी यांचा उलटतपास घेतला नसल्याने दिनांक १५/०९/२०२१ रोजी नि.क्र. ४१ वर उलटतपास नाही असा आदेश पारित करण्यात आला. सदर दाव्याचे स्वरुप, मागणी व नैसर्गीक न्यायाचे तत्व लक्षात घेता प्रतिवादी यांना वादी यांचे उलटतपासाची संधी देणे न्यायोचीत होईल. तसेच, वादी व प्रतिवादी यांच्यातील वादाचे अंतिमरीत्या निराकरण होणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक व गरजेचे आहे. मात्र वादींना झालेला त्रास लक्षात घेता योग्य तो खर्च प्रतिवादी यांच्यावर लादुन सदरचा अर्ज मंजुर करणे योग्य होईल. तरी मी पुढील आदेश पारित करीत आहे.

### आ दे श

०१. प्रतिवादी क्र. ०१ यांनी वादीस रुपये २००/-(रुपये दोनशे) शुल्क देणेच्या अटीवर अर्ज मंजूर.

०२. वादी व प्रतिवादी क्र. ०१ यांनी सदर आदेशाची नोंद घ्यावी.

. एस. पाटील)

Digitally signed by PRUTHAVI SANJAY PATIL Date: 2022.11.03 09:52:00 +0530

दिनांकः ०१/११/२०२२

दिवाणी न्यायाधीश क. स्तर, उमरखेड

**नि.दि.मु.नं. ४३/२०१८ मधील नि. ४४ वरील आदेश**

०१. प्रस्तुत अर्ज प्रतिवादी क्र. ०३ यांनी त्यांचे विरुध्द झालेला 'उलटतपास नाही' आदेश रद्दबातल करण्यासाठी दिलेला आहे.

०२. थोडक्यात प्रतिवादी यांचे कथन असे की, प्रतिवादी हे हजर नसल्याने वकील वादीचा क्रॉस घेवु शकले नाही व उपस्थीत राहीले नसल्याने सदरकामी प्रतिवादी विरुध्द 'उलट तपास नाही' आदेश दिनांक १५/०९/२०२१ रोजी नि.क्र. ४१ पारित करणेत आला. करिता प्रतिवादी विरुध्द झालेला 'उलटतपास नाही' आदेश रद्द होणेची विनंती केलेली आहे.

०३. प्रस्तूतचे अर्जास वादी यांनी आपले म्हणणे दाखल केलेले आहे. सदरच्या दाव्यात वादी याने त्यांचा पुरावा दिनांक २४/०१/२०२० रोजी दाखल केलेला आहे. सदरचे प्रकरण अनेक महिन्यापासून उलटतपासावर आहे. प्रतिवादी हे वारंवार पुकारले असता देखील हजर राहीले नाहीत. प्रतिवादीचा अर्ज खर्चासह नामंजूर करावा अशी विनंती केली आहे.

०४. सदर दाव्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, वादी यांनी त्यांचे सरतपासाचे प्रतिाज्ञापत्र दिनांक २४/०१/२०२० रोजी दाखल केलेले आहे. प्रतिवादी यांच्या वकीलांनी प्रतिज्ञा पत्राची प्रत दिनांक २४/०१/२०२० रोजी घेतलेली आहे. त्यानंतर पुरेसी संधी देवुन देखील प्रतिवादी यांनी वादी यांचा उलटतपास घेतला नसल्याने दिनांक १५/०९/२०२१ रोजी नि.क्र. ४१ वर उलटतपास नाही असा आदेश पारित करण्यात आला. सदर दाव्याचे स्वरुप, मागणी व नैसर्गीक न्यायाचे तत्व लक्षात घेता प्रतिवादी यांना वादी यांचे उलटतपासाची संधी देणे न्यायोचीत होईल. तसेच, वादी व प्रतिवादी यांच्यातील वादाचे अंतिमरीत्या निराकरण होणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक व गरजेचे आहे. मात्र वादींना झालेला त्रास लक्षात घेता योग्य तो खर्च प्रतिवादी यांच्यावर लादुन सदरचा अर्ज मंजुर करणे योग्य होईल. तरी मी पुढील आदेश पारित करीत आहे.

**आ दे श**

०१. प्रतिवादी क्र. ०३ यांनी वादीस रुपये २००/-(रुपये दोनशे) शुल्क देणेच्या अटीवर अर्ज मंजूर.

०२. वादी व प्रतिवादी क्र. ०३ यांनी सदर आदेशाची नोंद घ्यावी.

Digitally signed by PRUTHAVI SANJAY PATIL
Date: 2022.11.03 09:52:10 +0530

(पी. एस. पाटील)

दिनांकः ०१/११/२०२२ दिवाणी न्यायाधीश क. स्तर, उमरखेड